7 AUG 1993

जिल्हा परिषदेच्या निवासस्थान बाबतची नियमावली.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
क्रमांक :- पंरास-१०८९/सीआर-३६५२/२६, मंत्रालय, मुंबई,
दिनांक :- 30 जून १९९३

परिपत्रक :-

जिल्हा परिषदेकडे असलेल्या निवासस्थानाचा वापर जिल्हा परिषदेचे पदाधिकारी/अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता करण्यात येतो. जिल्हा परिषदेकडील निवासस्थानाच्या नियमांबाबत कोणतेही नियम तयार करण्यात आलेले नसल्यामुळे या निवासस्थानाचे वाटप, भाडे वसूली इत्यादि बाबत वेगवेगळ्या जिल्हा परिषदांकडून वेगवेगळी कार्यवाही केली जाते. जिल्हा परिषदेकडील निवासस्थानाच्या नियमामध्ये एकसूत्रीपणा आणण्यासाठी शासनाने मार्गदर्शक तत्वे घालून द्यावीत अशी पंचायत राज समितीने त्यांच्या सन १९८९-९० च्या १७ व्या अहवालामध्ये शिफारस केलेली आहे. पंचायत राज समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या निवासस्थानासाठी नियमावली तयार करण्यात आलेली आहे. सदर नियमावली सोबत जोडलेली आहे. या नियमावलीमधील नियमानुसार जिल्हा परिषदेकडील निवासस्थानांबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

[ आ. बा. पाटील ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१] विभागीय आयुक्त, सर्व,
२] मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व,
३] अध्यक्ष, जिल्हा परिषद, सर्व,
४] उप मुख्य कार्यकारी अधिकारी [सामान्य] जिल्हा परिषद, सर्व,
५] सभापती, बांधकाम समिती, जिल्हा परिषद, सर्व,
६] कार्यकारी अभियंता [बांधकाम], जिल्हा परिषद, सर्व,
७] मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व,
८] कार्यासन क्र. ०५, ३७, ४७, ६१, ५७, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, [illegible]

www.lekhamitra.blogspot.com

Scanned by CamScanner

## जिल्हा परिषदेच्या निवासस्थानाबाबत नियमावली :

हे नियम सर्व जिल्हा परिषदांना त्यांचे पदाधिकारी/ अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी जिल्हा परिषदेच्या उत्पन्नातून अथवा शासकीय अनुदानातून बांधण्यात आलेल्या सर्व निवासस्थानांना तसेच पंचायत समितीच्या निवासस्थानानाही लागू होतील.

### सविस्तर नियमावली.

१] निवासस्थाने वाटप करण्यासाठी एक समिती नेमण्यात यावी. त्या समितीस याबाबत सर्व अधिकार राहतील. तिचे सदस्य खालीलप्रमाणे असतील.

अध्यक्ष:- जिल्हा परिषदेचे अध्यक्ष हे समितीचे अध्यक्ष असतील.

सचिव:- जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी [सामान्य] हे समितीचे पदसिध्द सचिव राहतील.

सदस्य:- सभापती बांधकाम समिती, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी अभियंता [बांधकाम] व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, हे समितीचे इतर सदस्य राहतील.

ज्यावेळी एखाद्या तालुक्यातील निवासस्थानाचे वाटप असेल त्यावेळी त्या तालुक्याच्या पंचायत समिती सभापतीचा समितीमध्ये समावेश असेल.

२] निवासस्थानाचे व्यवस्थापन, परिरक्षण व दुरुस्ती बाबत कार्यवाही कार्यकारी अभियंता [बांधकाम] जिल्हा परिषद हे करतील, या निवासस्थानांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी निकषानुसार आवश्यक असलेल्या परिरक्षण अनुदानाची तरतूद जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकात करण्यात येईल. सदर निवासस्थानांची देखभाल व दुरुस्ती नियमित करून ती व्यवस्थित ठेवण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता [बांधकाम] जिल्हा परिषद हे करतील.

३] जिल्हा परिषदेच्या अधिनस्त असलेली निवासस्थाने ही जिल्हा परिषदेचे पदाधिकारी/ अधिकारी व कर्मचारी यांनाच वाटप करतील.

४] जिल्हा परिषदेचे अधिकारी अगर कर्मचारी यांचे मुख्यालयी अगर ते जेथे काम करीत असतील त्या ठिकाणी त्यांच्या स्वतःच्या किंवा कुटुंबातील कोणाही सदस्यांच्या मालकीचे/ भाड्याचे निवासस्थान अथवा सदनिका असल्यास ते निवासस्थानाचे वाटपात पात्र ठरणार नाहीत.

पृ. मा. प. २/-

www.lekhamitra.blogspot.com

Scanned by CamScanner

५]जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांना निवासस्थाना गरज असल्यास ते समितीच्या सचिवांकडे अर्ज सादर करतील. सचिव, निवासस्थानासाठी आलेले अर्ज व रिक्त निवासस्थानाची स्थिती लक्षात घेवून आपल्या शिफारशींसह ते अर्ज समितीपुढे निर्णयासाठी ठेवतील. व समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

६]निवासस्थान वाटप करणेबाबत समिती शक्यतो आपल्या बैठकीत निर्णय घेईल.

७]जिल्हा परिषदेचे पदाधिकारी /अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या दर्जानुसार चटई क्षेत्राची तरतूद असली तरी त्यांना त्यांच्या दर्जानुसार निवासस्थान मिळावेच असा आग्रह धरता येणार नाही. जिल्हा परिषदेकडील रिक्त निवासस्थाने विचारात घेवून त्यांना निवासस्थाने वाटप करण्यात यावीत. वाटप केलेले निवासस्थान नाकारल्यास त्यांच्या नावाचा परत विचार करण्यात येणार नाही.

८] वाटप करण्यात आलेले निवासस्थान सामान्यतः बदलून दिले जाणार नाही तथापि वैद्यकिय कारणास्तव अथवा अन्य सबळ कारणास्तव निवासस्थान बदलून देण्याचा विचार वाटप आदेशाच्या दिनांकापासून १ वर्षानंतर आणि उपलब्ध निवासस्थानांचा विचार करून करण्यात येईल.

९]निवासस्थान ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना वाटप करण्यात आले आहे. त्यांनी निवासस्थानाचा ताबा वाटप आदेश मिळाल्यापासून ७ दिवसाचे आत घेणे आवश्यक राहिल. जर वाटप केलेले निवासस्थान त्याला ताब्यात घ्यावयाचे नसेल तर त्याने ७ दिवसाचे आत समितीस त्याप्रमाणे लेखी कळवावे. अन्यथा वाटप केलेल्या कर्मचाऱ्यांस निवासस्थान वाटपाच्या दिनांकापासून ते दुसऱ्या अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचा ताबा घेतल्या दिनांकापर्यंत भाडे भरावे लागेल.

१०]जिल्हा परिषदेच्या ताब्यांत असलेल्या निवासस्थानांचे पदाधिकारी, वर्ग१ चे अधिकारी, वर्ग-२ चे अधिकारी, वर्ग-३ चे कर्मचारी व वर्ग-४ चे कर्मचारी असे वर्गीकरण करावे व त्या त्या वर्गाकरिता स्वतंत्र प्रतिक्षा यादी करावी.

११]रिक्त निवासस्थाना अभावी अर्जदारांना निवासस्थान वाटप करणे शक्य झाले नाही तर अशा अर्जदारांची प्रतिक्षासूची [

www.lekhamitra.blogspot.com

Scanned by CamScanner

तयार करुन पुढे बांधण्यात येणारी किंवा रिक्त होणारी निवासस्थाने प्रतिक्षा सूचीतील ज्येष्ठतेनुसार वाटप करण्यात यावीत.

१२] जे अधिकारी/कर्मचारी बाहेर गावाहून बदलीवर येतील त्यांना निवासस्थान प्राप्त करुन देणेबाबतचा विचार प्राधान्याने करण्यात यावा अशा वेळी बदलीच्या ठिकाणी निवासस्थान ताब्यात असलेल्या समपदांच्या अधिकाऱ्यांची/ कर्मचाऱ्यांची बदली झाल्यास शक्यतो तेच निवासस्थान त्यांच्या जागी येणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात यावे. मात्र याबाबतचा कोणताही निर्णय घेण्याचा अधिकारी समितीस राहील.

१३] निवासस्थानाचे वाटप करताना प्रशासकीय कारणास्तव बदली होऊन आलेल्या स्त्री अधिकारी/स्त्री कर्मचाऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच शासकीय नियमानुसार मागासवर्गीय कर्मचारी /अधिकाऱ्यांनी आरक्षण ठेवण्यात यावे.

१४] या नियमानुसार वाटप करण्यात आलेल्या निवासस्थानाचे [अनुज्ञाप्ती शुल्क व सेवाशुल्क शा. नि. वि. वि. क्र. घभाव१४८९/४०/सेवा-५ दिनांक ३०डिसेंबर९१ व शा. नि. सा. बा. वि. क्र. आरएल१०७७/प्र. क्र. १९८/२/मि. व्य. २ दिनांक ७ऑगस्ट९२ मधील तरतूदीनुसार व त्यानंतर वेळोवेळी सुधारीत केलेल्या आदेशानुसार विहित केलेल्या दराने वसूल करण्यात यावे. सदर शुल्क निवासस्थान धारकाच्या मासिक वेतनातून वसूल करुन ते दरमहा १५तारखेच्या आत जिल्हा परिषद निधीत जमा करण्यात यावे.

१५] नियमानुसार अनुज्ञाप्ती शुल्क व सेवाशुल्क भरण्यास विलंब झाल्यास त्याबाबतचे स्पष्टीकरण धारकाने समितीस सादर करावे. स्पष्टीकरण समाधानकारक न वाटल्यास समिती ठरविल त्याप्रमाणे विलंब शुल्क भरावे लागेल.

१६] सदर अनुज्ञाप्ती शुल्क व सेवाशुल्क वसूल करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालयाचे आहरण व वितरण अधिकारी यांची राहील.

१७] मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांनी सदर भाडयाबाबत दर तीन महिन्याने आढावा घेऊन निवासस्थानाच्या अनुज्ञाप्ती शुल्क व सेवा शुल्क रक्कम कुणाकडेही थकीत राहणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. त्यांबाबतचा तिमाही अहवाल त्यांनी समितीस सादर करावा.

१८] एखाद्या धारकास स्वत: निवासस्थान रिक्त करावयाचे असेल तर त्याने त्याप्रमाणे १ महिना अगोदर समितीस लेखी कळविणे आवश्यक आहे. तसे न केल्यास त्यास निवासस्थान [illegible] केल्याबद्दल [illegible]

www.lekhamitra.blogspot.com

Scanned by CamScanner

आदेश प्राप्त होईपर्यंत पुढील महिन्याचे अनुज्ञाप्ती शुल्क व सेवा शुल्क भरावे लागेल.

१९] निवासस्थान वाटप केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांस देय असलेला घरभाडे भत्ता जिल्हा निधीमध्ये दरमहा जमा करावा.

२०] निवासस्थानाचा मालमत्ता कर, नगरपालिका, महानगरपालिका कर अथवा ग्रामपंचायत कर जिल्हा परिषदेने स्वत: भरावा व प्रत्येक निवासस्थानी स्वतंत्र मीटर असलेला पाणीपट्टी, विजेचे बील इत्यादी निवासस्थान धारकाने भरावे.

२१] सेवा शुल्काची रक्कम कार्यकारी अभियंता [बांधकाम] जिल्हा परिषद यांनी प्रत्येक निवासस्थानासाठी अथवा प्रत्येक प्रकारच्या निवासस्थानासाठी निश्चित करावी. सदर सेवाशुल्क दराचे दोन वर्षांनंतर पुनर्विलोकन करण्यात यावे. सेवाशुल्क रक्कम ठरविताना निवासस्थानाची सामुहिक लाईट, झाडलोट, पाणी इत्यादी गोष्टीचा विचार करावा. पाणी लाईट यासाठी स्वतंत्र मिटर असलेला सेवाशुल्क रक्कम त्या प्रमाणात कमी होईल.

२२] जिल्हा परिषदेच्या निवासस्थानाची नोंदवही कार्यकारी अभियंता [बांधकाम] हे ठेवतील त्यामध्ये निवासस्थानाच्या सर्व बाबींची नोंद असावी.

२३] कर्मचाऱ्यास वाटप केलेले निवासस्थान निवासाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता येणार नाही.

२४] निवासस्थान ताब्यात घेतेवेळी या नियमावलीतील असलेले सर्व नियम मान्य असल्याबाबत करारनामा, धारकाकडून करून घ्यावा.

२५] निवासस्थान रिक्त करताना ते सुस्थितीत असावे कर्मचारी/अधिकाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे अथवा चुकीच्या कृतीमुळे निवासस्थानाचे नुकसान झालेले असल्यास ते त्यांच्याकडून वसूल करण्यात येईल.

२६] निवासस्थान धारक सेवानिवृत्त झाल्यास अगर तो नोकरी सोडून गेल्यास त्याने निवासस्थान निवृत्तीच्या किंवा सेवा सोडल्याच्या दिनांकापासून २ महिन्याच्या आंत रिक्त करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. २ महिन्यानंतरच्या कालावधीसाठी आर्थिक दराने भाडे आकारण्यात येईल.

www.lekhamitra.blogspot.com

Scanned by CamScanner

२७] निवासस्थान धारकाची बदली झाल्यास अगर धारकाने केलेले पद रिक्त झाले तर निवासस्थान बदलीच्या धारण केलेले पद रिक्त झाल्याच्या दिनांकापासून ३ महिन्याच्या आत रिक्त करणे आवश्यक आहे. त्याने नियमबाह्य वर्तन करून अनधिकृतपणे निवासस्थान ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला तर त्याच्या विरुद्ध निष्कासन कारवाई करावी.

२८] एखाद्या निवासस्थान धारकाची बदली झाली अगर तो सेवानिवृत्त झाला परंतु कुटुंबातील व्यक्तीच्या गंभीर आजारास्तव तो निवासस्थान रिक्त करु शकला नाही तर त्यास पहिले दोन महिने मूळ वेतनाच्या १०% याप्रमाणे भाडे भरावे लागेल. सेवानिवृत्त कर्मचा-यांस दोन महिन्यानंतर आर्थिक दराने भाडे आकरण्यात येईल. बदली झालेल्या परंतु सेवेत असलेल्या कर्मचा-यांस त्यानंतर चार महिने मूळ वेतनाच्या २०% दराने किंवा प्रमाणित दराने[स्टॅंडर्ड रेट] यापैकी कमी दराने घरभाडे भरावे लागेल अशी सवलत याप्रमाणे फक्त सहा महिने पर्यंत देण्यात यावी. यानंतर समितीने त्यास निवासस्थानी रहाण्याची मुभा दिली तर त्याने नियमानुसार बाजारभावाने पूर्ण घरभाडे भरावे.

३०] वरील नियमाअंतर्गत निर्णयाधिका-यांनी केलेली कार्यवाही अन्यायकारक वाटली तर त्याबाबत विभागीय आयुक्तांकडे अपील करता येईल त्यांनी दिलेला निर्णय अंतिम राहील.

www.lekhamitra.blogspot.com

Scanned by CamScanner